**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर मारूतीराव पंडित — अपीलकर्ता
कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.२, डीएड
कॉलेजजवळ, लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडूज ता. खटाव, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज,
ता.खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. मधुकर मारूतीराव पंडित
कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.२, डीएड कॉलेजजवळ,
लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, वडूज ता. खटाव, जि. सातारा
श्री. व्ही. के. गडांकुश

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडूज, ता.खटाव, जि. सातारा श्री. बी. एस. मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वडूज, ता. खटाव, जि.सातारा येथील सेतू सुविधा केंद्रात मन मानेल त्याप्रमाणे रक्कम स्वीकारली जाते व पावती दिली जात नाही, अशी तक्रार उप विभागीय अधिकारी (महसूल), फलटण विभाग, फलटण यांच्याकडे आपण केली. या सुविधा केंद्रातील पावतीच्या प्रमाणित प्रती व अन्य माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडूज यांच्याकडे मागितली होती. त्यांनी शुल्क भरण्यास कळविले, त्यानुसार मनी ऑर्डर केली. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी मूळ माहितीऐवजी न मागितलेल्या माहितीची यादी व तीही दोन प्रतीत पाठविली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज, ता. खटाव यांनी अपिलाची दखल घेतली नाही. तीन वेळा माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला कळविले, त्या पत्रावर सही नाही. तसेच अशी माहिती आपल्याला प्राप्तही झाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मधुकर मारूतीराव पंडित यांनी केली.

श्री. पंडित यांचा अर्ज प्राप्त झाल्यावर यु.पी.सी.ने माहिती पाठविली होती. संबंधित तत्कालीन कत्रांटदारांनी पावती पुस्तक पुरविले नसल्याने संगणकावरून माहिती दिली, तसेच कत्रांटदारही बदलण्यात आले आहेत, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस. एच. खाडे यांनी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही.के.गडांकुश यांनी केले. दिलेल्या उत्तराच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री. एस. एच. खाडे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले असले तरी माहितीबाबत योग्य ती पूर्तता केलेली नाही. मात्र संबंधित कत्रांटदारानेच पावती पुस्तक दिले नसल्यामुळे सेतू प्रणालीमधील तारीखवार प्रमाणित पत्राच्या नोंदीची प्रत दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दोन प्रतीत यादी पाठविण्याचे व त्याचे शुल्क अपीलकर्त्यास आकारण्याचे कारण नव्हते, हे लक्षात घेता अपीलकर्त्यास त्याच्या शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज यांनी व्यक्तिश: परत द्यावी व ऊर्वरित माहिती आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस. एच. खाडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही. के. गडांकुश यांनी जमा पावत्या नसल्याचे आयोगापुढे सांगितले होते. त्याच काळातील जमा पावत्यांच्या स्थळ प्रतींच्या छायांकित प्रती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडूज श्री. बी.एस.मोहिते यांनी पाठविल्या. याचा अर्थ

तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असा होतो व त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. पंडित यांनी दि. १२.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. या तक्रारीच्या अनुषंगाने व अहवाल सादर न केल्याबाबत आयोगाने दि. ५.१०.२००९ च्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज यांच्याकडून खुलासा मागविला. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वडूज श्री. बी.एस. मोहिते यांनी दि. २६.१०.२००९ रोजी खुलासा सादर केला. श्री. पंडित यांना त्यांच्या विनंतीनुसार दि. २६.२.२००९ च्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविल्याचे व श्री. पंडित यांच्या मागणीप्रमाणे ग्राहकांना द्यावयाच्या पावतीबाबत नवे कन्त्रांटदार व जिल्हाधिकारी, सातारा यांच्यामध्ये झालेला कराराची प्रतही पाठविली असल्याचे दि. २६.१०.२००९ च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या प्रतीसह त्यांनी आयोगास अवगत केले. ते लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केलेली नाही, तसेच शुल्काची आकारलेली रक्कम अपीलकर्त्यास परत केलेली नाही, हे स्पष्ट होते. श्री. एस. एच. खाडे यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. याचा अर्थ त्यांना याबाबत काही म्हणावयाचे नाही, असा होतो. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे हे शास्तीस पात्र ठरतात. तसेच तत्कालीन अपिलीय प्राधिकारी, तथा तहसीलदार वडूज श्री. एस. जी. सोरटे यांनी अपिलाची कोणतीही दखल घेतली नाही, ही बाबही कायद्याचा भंग करणारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे यांनी शुल्काची आकारलेली रक्कम अपीलकर्त्यास परत केलेली नाही व योग्य माहितीही दिली नाही. त्यामुळे त्यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. खाडे यांच्या जानेवारी २००९ व फेब्रुवारी २००९ च्या फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० मध्ये देय

असलेल्या वेतनातून कपात करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही. के. गडांकुश यांनी करावी व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

३. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी, तथा तहसीलदार, वडूज श्री. एस. जी. सोरटे यांनी प्रथम अपिलाची दखल घेतली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार ही कृती नियमबाह्य असून त्याबद्दल त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

४. आयोगाच्या मौखिक आदेशाप्रमाणे अपीलकर्ता श्री. मधुकर मारूतीराव पंडित यांना शुल्काची रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री. एस. एच. खाडे यांनी त्वरित परत करावी, व तसे आयोगास सप्रमाण अवगत करावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामराव बळवंतराव गरूड — अपीलकर्ता
मा.पो. पाटील द्वारा मायबोली ग्राफिक्स्,
३९२, सदाशिव पेठ, शारदा गणेश अपार्टमेंट,
पुणे-४११ ०३०

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. रामराव बळवंतराव गरूड<br>मा.पो. पाटील द्वारा मायबोली ग्राफिक्स्,<br>३९२, सदाशिव पेठ, शारदा गणेश अपार्टमेंट,<br>पुणे-४११ ०३०<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली,<br>जि.पुणे श्री. जगदीश ह. निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.११.२०६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील नवीन शर्त व वारसांची नावे कोणत्या फेरफाराने व कोणाच्या आदेशाने कमी केली, याची माहिती आपल्याला जाणीवपूर्वक दिली जात नाही. या प्रकरणी आपल्या तक्रारीवर मुद्देनिहाय चौकशी करून तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित तलाठी श्री. एस. बी. खुटवड यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी, असे उप आयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे यांनी दि. ३०.७.२००७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविले होते, परंतु अशी कार्यवाही झाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रामराव बळवंतराव गरूड यांनी केली.

नोंदीशी संबंधित हा विषय असून श्री. गरूड यांना अपेक्षित माहिती आढळ होत नाही. सन १९८९ मध्ये नावे कमी झालेली कागदपत्रांवरून दिसतात, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, पुणे श्री. जगदीश ह. निबांळकर यांनी सांगितले.

संबंधित प्रकरणातील सर्व कागदपत्रे श्री. गरूड यांना देण्यात आली असून नोंदीच्या फेरफारांची त्यांची मागणी आहे. त्याबाबत त्यांनी उपविभागीय अधिकारी, हवेली, पुणे उपविभाग यांच्याकडे अपील करणे आवश्यक आहे, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव देशमुख यांनी लेखी निवेदनात नमूद केले.

श्री. गरूड यांनी नमूद केलेली नावे वारसानुसार इतर हक्कात दाखल आहेत. नावे कमी झालेली नाहीत. तसेच ७/१२ उतारे वेळोवेळी त्यांना देण्यात आले आहेत, तरीही विनाकारण त्रास देण्याच्या हेतूने ते अर्ज करीत असतात, असे तलाठी, फुरसुंगी श्री. एस. बी. खुटवड यांनी दि. १२.६.२००८ च्या लेखी निवेदनात संबंधित ७/१२ उताऱ्यांच्या प्रतीसह नमूद केले आहे.

जमीनविषयक मूळ अभिलेखात अनधिकाराने बदल झाला असल्यास ते कोणत्या आधारे व कोणी केला गेला. याची माहिती अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे. या अनुषंगाने, उपायुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना लिहिलेल्या पत्रावरील कार्यवाहीचा अहवाल प्राप्त करून घेऊन अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मूळ कागदपत्रांतील बदलासंबंधीच्या अपीलकर्ता श्री. रामराव बळवंतराव गरुड यांच्या तक्रारीबाबत उप आयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे यांनी दि. ३०.७.२००७ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना लिहिलेल्या पत्रावर जिल्हाधिकारी पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांच्याकडून प्राप्त करून घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांनी दि. २५.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची एक प्रत अपीलकर्त्यांस पुरवावी.

पुणे
दि. ०८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. बुऱ्हाण अहमद शेख (रेणापुरे)
मु.पो.सिध्दार्थनगर, मोहोळ, ता. मोहोळ,
जि. सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी सावळेश्वर, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा | तलाठी सावळेश्वर, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>श्रीमती विजया रविंद्र भुजबळ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स तसेच दि. ३०.६.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्तांपुढे झालेल्या सुनावणीसही अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

अपीलकर्ता श्री. बुऱ्हाण अहमद शेख (रेणापुरे) यांनी मागितलेली माहिती ढोबळ, सरसकट, विस्तृत स्वरूपाची आहे. संपूर्ण गावाची अशा स्वरूपाची माहिती दारिद्रय रेषेखालील व्यक्तीने मागितल्यास ती निःशुल्क देणे शक्य नसल्यामुळे समक्ष येऊन अवलोकन करण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सावळेश्वर, ता. मोहोळ श्रीमती विजया रविंद्र भुजबळ यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री. शेख (रेणापुरे) यांनी आयोगाकडे अपील केले होते. परंतु माहिती मिळाल्यामुळे कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे निवेदन श्री. शेख (रेणापुरे) यांनी दि. २६.६.२००९ च्या पत्रान्वये केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.९.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश वसंत केसकर
मु.पो. भांबुर्डी, ता. माळशिरस

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बारामती, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१० + ८११ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रमेश वसंत केसकर<br>मु.पो. भांबुर्डी, ता. माळशिरस |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | तहसीलदार, बारामती, जि.पुणे<br>श्री. हिम्मत खराडे |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | निवासी नायब तहसीलदार, बारामती<br>श्री. बी. जी. गोरे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ३०.६.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्तांपुढे सुनावणी घेण्यात आली.

सन १९९१ मध्ये केलेले विहीर अधिग्रहण व सन १९८५ मध्ये झालेल्या ३२-ग प्रकरणातील कागदपत्रे याची माहिती देण्यात टाळाटाळ करण्यात येत आहे. संबंधित लिपिक श्री. मोहन बापूराव कांबळे यांनी कागदपत्रे दाखविली, परंतु त्याच्या नकला मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती श्री. बी. जे. गोरे यांनी त्यात लक्ष घातले नाही व श्री. कांबळे यांनी नंतर कागदपत्रे सापडत नसल्याचे सांगितले. विहीर अधिग्रहणाची नुकसान-भरपाई मिळावी व ३२-ग प्रकरणातील नकला मिळाव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रमेश वसंत केसकर यांनी केली.

श्री. केसकर यांचे अनेक अर्ज असून प्रत्येक अर्जासाठी ते भेटत असतात. संबंधित कागदपत्रांच्या नकला एक महिन्याच्या आत देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती, जि. पुणे श्री. समीर शिंगटे यांनी दिले होते. आपण शोध घेतला असता दाखविलेली संचिका आपली नसल्याचे श्री. केसकर यांनी सांगितले. अन्य कागदपत्रांचा शोध घेत असताना ही कागदपत्रे सापडली. माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती श्री. बी. जे. गोरे यांनी केले.

विहीर अधिग्रहण प्रकरणातील कागदपत्रे दहा वर्षांपर्यंत जतन करण्याची आहेत. शोधूनही ती प्राप्त होत नाहीत. तसेच विहीर अधिग्रहण नुकसान भरपाई देण्याचे आदेश गट विकास अधिकारी यांचे आहेत. ३२-ग प्रकरणातील दाखविलेली मूळ संचिका आपली नसल्याचे प्रतिपादन श्री. केसकर करीत आहेत, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती, जि. पुणे श्री. हिम्मत खराडे यांनी मूळ संचिकेसह नमूद केले.

अपीलकर्ता अनेक अर्ज करीत असले तरी माहिती मागण्यासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागणे व एक महिन्यांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती यांनी देऊनही माहिती न दिली जाणे योग्य नाही. जतनाच्या कालावधीनुसार कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती यांनी कळविले आहे. संबंधित नोंद कायदेशीर आहे काय, अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. मात्र अन्य कागदपत्रांच्या नकला प्राप्त करून देणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्त्यास माहितीसाठी करावा लागणारा दोन वेळचा प्रवास खर्च संबंधित लिपिक / जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती यांनी द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार ३२-ग प्रकरणातील कागदपत्रांच्या नकला व प्रवास खर्चापोटी रू. ३००/- मिळाले असून आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्ता श्री. केसकर यांनी दि. ३०.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. देविदास धोंडीबा पांडकर
मु.पो.वाल्हे, ता. पुरंदर, जि. पुणे — अपील

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर जि. पुणे — उत्तरवा

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वाल्हे, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर जि. पुणे डॉ. स्मिता पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वाल्हे, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. ए.एस. ढोले | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्याने दि. १७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली, त्यावेळीही अपीलकर्ता गैरहजर होते.

माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. देविदास धोंडीबा पांडकर यांनी केली आहे. परंतु त्यांना पूर्वीच माहिती देण्यात आली असल्याचे व तशी त्यांची सही असल्याचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वाल्हे, ता. पुरंदर श्री. ए.एस. ढोले व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर (सासवड), जि. पुणे डॉ. स्मिता पाटील यांनी केले.

अपीलकर्त्याची स्वाक्षरी असलेल्या पत्राच्या प्रतीसोबत व सर्व अनुषंगिक कागदपत्रांसह अहवाल सादर करण्याचे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वाल्हे, ता. पुरंदर श्री. ए. एस. ढोले यांनी दि. १८.१.२०१० च्या पत्रान्वये कागदपत्रांसह अहवाल आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे ..... **अपीलकर्ता**
पिताश्री कॉम्प्लेक्स, वंटमुरे कॉर्नर,
सांगली रोड, मिरज, जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता, ..... **उत्तरवादी**
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज,
जिल्हा सांगली

**जन माहिती अधिकारी**
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६/२०१० सांगली |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ३०/११/२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** रस्ता चौपदरीकरणासाठी करण्यात आलेल्या वृक्षतोडी संदर्भात एकूण ४ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दि. १९-०१-२०१०.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.युवराज गोरख रोकडे
मु.हिंगणी(पा) पो.मळेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.युवराज गोरख रोकडे
मु.हिंगणी(पा) पो.मळेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सं.कृ.चिल्लाळ

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

हिंगणी ग्रामपंचायतीने केलेल्या कामामधील गटारे कोठून कोठपर्यंत बांधली याची माहिती दिली नाही. ग्रामसेवक सहा-सहा महिने गावात येत नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.युवराज गोरख रोकडे यांनी केले.

श्री.रोकडे यांनी विविध प्रकारची माहिती मागणारे नऊ अर्ज केले आहेत. ढोबळ मानाने सरसकट अशी विस्तृत स्वरूपाची माहिती त्यांनी मागितली होती. पंचायत समितीकडील माहिती विहित मुदतीत दिली व ग्रामपंचायत स्तरावरील माहितीसाठी सरपंच व ग्रामसेवक यांना पत्र लिहिले. सन १९९० पासूनची घरकुलाबाबतची माहितीही त्यांनी मागितली असून तीही देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम)उपविभाग, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील यांनी केले. अपीलकर्ता श्री.रोकडे हिंगणी येथील नसून तुळजापूर येथील रहिवासी आहेत. हिंगणीमध्ये त्यांचा भूखंड नव्हता. पुनर्वसित गावठाण असून दारिद्र्यरेषेखालील यादीत श्री.रोकडे यांचे नाव आल्याने त्यांना घरकुल देण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सं.कृ.चिल्लाळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मागणी विस्तृत व ढोबळ स्वरूपाची आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. तथापि, सन २००५-२००६ मधील गटाराच्या बांधकामाबाबतची माहिती सरपंच/ग्रामसेवक यांनी तीन दिवसात द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि.३०.१.२००९ रोजी सरपंचांनी दिलेली माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम)उपविभाग, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील यांनी आयोगास अवगत केले. अपीलकर्ता श्री.रोकडे दारिद्र्येरेषेखालील असून विस्तृत स्वरूपाची माहिती मागणी करणारे अनेक अर्ज करीत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम)उपविभाग, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, ता.बार्शी, यांचे म्हणणे रास्त असून अपीलकर्त्याने नेमक्या माहितीची मागणी करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. धोंडाप्पा कुंडलिक साखरे
मु.पो. डोंगरगाव, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, समाजसेवा मंडळ, वाणी चिंचाळे,
ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. धोंडाप्पा कुंडलिक साखरे<br>मु.पो. डोंगरगाव, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर तर्फे प्रतिनिधी<br>श्री. एस. वाय. जाधव |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | अध्यक्ष, समाजसेवा मंडळ, वाणी चिंचाळे,<br>ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. विरभद्र शंकर स्वामी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

न्यासाबाबतची आपण मागितलेली माहिती देण्यास अपिलीय प्राधिकारी तथा सहाययक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी आदेश देऊनही न्यासाकडून माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. धोंडाप्पा कुंडलीक साखरे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

संस्थेच्या सचिवांचे निधन झालेले असल्यामुळे व सन १९९२ पासूनची माहितीची मागणी असल्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. उपलब्ध माहिती निःशुल्क दिली, असे निवेदन न्यासाचे अध्यक्ष श्री. विरभद्र शंकर स्वामी यांनी माहितीची प्रत व पोच पावतीसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता संस्थांतर्गत वाद धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्यापुढे प्रलंबित असल्याचे स्पष्ट होते. सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रं. ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्त्याने सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. भरत बाळासाहेब विटकर
स.नं.१२६, आकाशनगर, वारजे, पुणे-५२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप संचालक,
नगररचना, पुणे विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** नगर रचनाकार,
उपसंचालक नगररचना कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९/२०१०/पुणे |
| २ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-</u>**<br>नगररचना विभागात खेळाडूंसाठीच्या राखीव जागांवरील भरतीसंदर्भात | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता, श्री. भरत बाळासाहेब विटकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०३/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रकांत रघुनाथ शिर्के
४/२८८, स्वारगेट पोलीस कॉलनी, पुणे-४२ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
(प्रशासन), वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे श्री. मनोज पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन), वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे श्री. पी. ए. जाफरभाई | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. चंद्रकांत रघुनाथ शिर्के, पोलीस उपनिरीक्षक यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर हे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला, तसेच आयोगापुढील सुनावणीला उपस्थित असले तरी अपीलकर्ता श्री. शिर्के उपस्थित नव्हते. त्यांच्या सर्व मुद्दयांचा अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयात परामर्श घेण्यात आला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, (प्रशासन), वाहतूक शाखा, पुणे श्री. पी. ए. जाफरभाई व अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर श्री. मनोज पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर श्री. मनोज पाटील यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर दिगंबर जोजारे — अपीलकर्ता
२९, मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. प्रभाकर दिगंबर जोजारे<br>२९, मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | तहसीलदार, दक्षिण सोलापूर श्री. दीपक म.वजाळे |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर<br>श्री. ए. जे. भोसले |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.८.२००७, ३.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७, २४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तहसीलदारांनी मंजूर केलेल्या बिनशेती आदेशानुसार ले-आऊट नकाशा मिळाला नाही. अनेक अर्ज करून व हेलपाटे मारूनही गाव कामगार तलाठी होटगी, मंडल अधिकारी व तहसीलदार यांनी फेरफार नोंदीविषयी तक्रारीनुसार कार्यवाही केली नाही, याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रभाकर दिगंबर जोजारे यांनी केली.

श्री. जोजारे यांनी मागितलेली माहिती सन १९७२ ते १९८८ च्या कालावधीतील आहे. लेआऊटचा नकाशा उपलब्ध होत नसल्यामुळे देता आला नाही, मात्र अन्य माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर श्री. ए. जे. भोसले यांनी केले. माहिती पूर्ण दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले व त्यांना माहितीबाबत समज दिली, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर श्री. दीपक म. वजाळे यांनी केले. मूळ अर्जानुसार बरीचशी माहिती आपण समक्ष दिली. मात्र जुने अभिलेख असल्यामुळे व आपल्याकडे अन्य पदाचा कार्यभार असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर श्री. ए. जे. भोसले यांनी दिले.

मंजूर लेआऊट नकाशाची प्रत भूमि अभिलेख विभागाकडून उपलब्ध करून अपीलकर्त्यास पंधरा दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीविषयक आक्षेप नोंदविणाऱ्या आहेत, तसेच फेरफार नोंदी बेकायदेशीर असून रद्द करून त्याप्रमाणे नोंदी होऊन ७/१२ उतारे मिळावेत, अशी मागणी आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर श्री. दीपक म. वजाळे यांनी दि. १७.७.२००९ रोजी आयोगाला अहवाल सादर केला. अभिलेख कक्षात शोध घेतला असता सन १९८२ मधील संबंधित जमिनीच्या मूळ मालकाच्या संचिकेत समाविष्ट असलेली लेआऊटची प्रत श्री. जोजारे यांना दि. १३.७.२००९ रोजी देण्यात आली. त्यांची अन्य मागणी खरेदी-विक्री

व्यवहाराच्या नोंदी संदर्भातील आहे. त्याविषयीचे त्यांचे अपील अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे प्रलंबित आहे, असे या अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.१.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

१. श्री. भिमराव (दादा) कडाळे पाटील
२. श्री. गोकुळ अण्णा कडाळे पाटील
मु.पो. पिंपरी खुर्द, ता. इंदापूर, जि. पुणे.

अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पोवई नाका, सातारा.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पोवई नाका, सातारा.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९/२०१०/पुणे |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/११/२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा अंतर्गत विविध उपविभागांनी सन २००७-२००९ या कालावधीत किती बिले काढली, झालेल्या कामाचा प्रकार, देखभाल दुरुस्तीसह कामाची प्रशासकिय रक्कम, खर्च झालेली रक्कम व तक्रार अर्जांच्या छायांकित प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. भिमराव (दादा) कडाळे पाटील व श्री. गोकुळ अण्णा कडाळे पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब,तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ.

कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. ११.०१.२०१०

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपत आगतराव झेंडगे — अपीलकर्ता
रा. भांबेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा — गट विकास अधिकारी, मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा — गट शिक्षण अधिकारी, मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |
| ३ | उपस्थित<br>अपिलीय प्राधिकारी तथा — गट विकास अधिकारी, मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनिषा देसाई<br>जन माहिती अधिकारी तथा — गट शिक्षण अधिकारी, मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर श्री. बी. डी.पांढरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे भांबेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या खोल्यांबाबत दिलेली माहिती खोटी आहे. एक खोली गेली दहा वर्षे वापरात नसून अन्य कोणाला भाडयाने दिलेली नाही, हे म्हणणे खोटे आहे. असे अपीलकर्ता श्री. गणपत आगतराव झेंडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात नमूद केले असून पुराव्या दाखल छायाचित्रे सादर केली आहेत.

श्री. झेंडगे यांना वस्तुस्थितीनुसार योग्य माहिती देण्यात आली आहे. नादुरुस्त खोली कुलूपबंद अवस्थेत आहे. ती कोणासही वापरास वा भाड्याने दिलेली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, मोहोळ श्रीमती मनिषा देसाई यांनी केले. खोली वापरात असणे वा भाडयाने दिली असणे हे छायाचित्रावरुन गृहीत धरता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. खान एहसान मेहबुब
१६३५/२६, व १८०७/२५,
भिमपुरा, कँम्प, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक पोलीस आयुक्त,
लष्कर विभाग, पुणे-१

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.७.२००९ |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** महाराष्ट्रातील पोलीस स्टेशनांची नावे व पत्ते | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री. खान एहसान मेहबुब यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब जोडलेली नाहीत. तसेच उपलब्ध कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. तसेच अतिव्याप्त व सरसकट स्वरुपात माहिती मागितलेली असून जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे श्री.ए.व्ही.गायकवाड यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तमराव शामराव घाटुळे — अपीलकर्ता
२३५७, ज्ञानदिप मिरज रोड, सांगोला
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज, सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** | श्री. उत्तमराव शामराव घाटुळे<br>२३५७, ज्ञानदिप मिरज रोड, सांगोला<br>जि. सोलापूर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज, सांगोला येथे विद्यार्थ्यांकडून माहिती-तंत्रज्ञान विभागासाठी घेतले जाणारे शुल्क, विकास निधी याची पावती दिली जात नाही. विशिष्ट वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल मागणी केली असता दिला जात नाही. आपल्याला जून २००१ पासून कनिष्ठ महाविद्यालयाचे उपमुख्याध्यापकपद द्यावयास हवे होते, ते जून २००४ पासून दिले. मात्र या पदाचे अधिकार वापरु दिले नाहीत. मुख्याध्यापक व संस्थेचे सचीव हे पती-पत्नी असल्यामुळे परस्परांना पाठीशी घालण्यासाठी माहिती नाकारली जाते. त्यांच्या चिरंजीवाना नियमबाह्य नेमणुक दिली. संस्थेतील कर्मचारीही त्याच संस्थेत पदाधिकारी असल्यामुळे शैक्षणिक कामे स्वतः करीत नाहीत. अनेक गैरमार्गांचा अवलंब करतात. शिक्षणाधिकाऱ्यांकडून माहिती मिळाली. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज, सांगोला श्री. रा. सो. पतंगे यांनी याबाबतची माहिती दिली नाही. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. उत्तमराव शामराव घाटुळे यांनी केली.

श्री. घाटुळे हे संस्थेत उपमुख्याध्यापक असून एकाच अर्जामध्ये प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय आणि संस्था अशा भिन्न विभागांची माहिती ते मागवीत आहेत. १२ वर्षांच्या काळातील जमा-खर्चाचा तपशील त्यांनी मागितला होता. तो कार्यालयात पाहण्यास येण्यास त्यांना कळविले होते व इतर माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविली. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या विचारणेनंतर त्यांच्याकडेही माहिती सादर केली, असे अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला श्री. चं. गु. अंकलगी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार १२ वर्षांच्या जमा खर्चाच्या विवरणपत्राच्या सत्य प्रती त्यांना पाठविल्याचे स्वतंत्र पत्राद्वारे कळविले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहिती पुरविण्याबाबत संस्थेने प्रारंभी तत्परता दर्शविलेली नाही, परंतु तांत्रिकदृष्ट्या कार्यवाही पूर्ण केली आहे. अपीलकर्ता यांनी एका अर्जात अनेक विभागांची माहिती मागताना संदिग्धता न ठेवता नेमकेपणा

राखणे आवश्यक आहे. श्री. घाटुळे यांनी उपस्थित केलेले प्रशासकीय कार्यवाहीचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१.२०१०